SATURDAY CLUB GLOBAL TRUST


www.scgt.org.in

स्वर्गीय माधवराव भिडे स्मृती विशेषांक

# SATURDAY CLUB TIMES

JUNE-JULY 2022. E-MAGAZINE. ISSUE 3

## माणसे घडवणारा माणूस



सॅटर्डे क्लबचा
**पहिला नामफलक**

भिडे साहेब
**व्यक्ती नाही वल्ली**

भिडे साहेब
**माझे दैवत**

भिडे साहेबांची
**आवडती कवीता**

भिडे साहेबांना
ज्यानी घडवलं ते
**नाना आणि आई**




As per study 75% of Entrepreneur driven organizations shutdown business as the Entrepreneur stops working or dies. All SME Entrepreneurs struggle their entire life to build a 'Self-Sustaining' organization that will survive beyond them. But, they fail because they lack the Right Business Education, Expert Business Advice and Self-transformation skills to become an evolved business leader.

An Entrepreneur is the key source of 'energy' driving an organization. TransGanization believes no amount of Business Education or Business Consulting will help an Entrepreneur unless he/she is able to transform oneself into a 'Spiritual Business Leader' who will be capable of evolving their organization beyond themselves.

TransGanization is the only Spiritual Business Management program designed to transform Entrepreneurial Organizations into 'Self-Sustaining' organizations. The program offers a unique blend of Spiritual Awareness + Business Education + Business Consulting giving the Entrepreneur the right platform to transform their organization into a 'Self-Sustaining' and 'Constantly Evolving' organization. TransGanization team with over 50 years of Business Management Experience will mentor this entire 'Organization Transformation' process along with the Entrepreneur.

If you are an Entrepreneur seeking a solution to build a 'Self-Sustaining' and 'Evolved Organization' then we would like to team-up with you. Let's meet up!

## SAKSHATKAR

**Sakshatkar is a intense Workshop for Entrepreneurs to Transform their Organization into a Self-Sustaining Organization.**

16-18 Sep '22

Fountain Head, Alibaug

CALL: +9170456 89864

Text <SCGT MEMBER> on 7045689864
to get special offer for Saturday club members

View our Program videos and learn more about us:

YouTube /transganization www.transganization.com

TRANSGANIZATION

Enlightened Business Practices

Office No. 226, 2nd Floor, NBC Complex, Plot No. 43, Sector 11 CBD Belapur, Navi Mumbai - 400614.

## अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| Respected Trustees | 2 |
| Board of Directors | 3 |
| सॅटर्डे क्लबची माहिती | 4 |
| सॅटर्डे क्लबच्या नावाचा पहिला नामफलक (बोर्ड) - श्री. अशोकराव दुगाडे | 5 |
| भिडे साहेब व्यक्ती नाही वल्ली - डॉ. अजित मराठे | 7 |
| माधवराव भिडेसाहेब..माझे दैवत - नरेंद्र ह. बगाडे | 10 |
| भिडे साहेबांना ज्यांनी घडविले ते नाना आणि आई | 15 |
| असेही भिडे साहेब | 20 |
| भिडे साहेबांनी रचलेली कविता | 25 |
| भिडे साहेबांप्रती काही निवडक भावना | 26 |
| महा एमडीपी | 31 |
| रिजनमधील महत्त्वाच्या घडामोडी | 32 |
| चॅप्टर्सच्या उल्लेखनीय कामगिरी | 34 |
| चॅप्टर्सचे जबरदस्त कार्यक्रम | 38 |
| अबोली ते मिसेस इंडिया - स्वप्नपूर्ती प्रवास | 42 |
| Protect YOUR Business from Yourself – KUNDAN GURAV | 47 |
| सॅटर्डे क्लबचे हिरे | 51 |
| Healthy Water - Kangen Water | 54 |
| DO YOU WISH TO GROW YOUR BUSINESS? | 56 |
| मुंबई झोन विमेन विंगची यशोगाथा | 58 |
| महाराष्ट्राचे धगधगते 'उदयोग कुंड' माधवराव भिडे जगदीश कुलकर्णी | 62 |
| Meeting Schedule | 66 |
| सॅटर्डे क्लब मधील चॅप्टर्सची माहिती | 68 |
| सॅटर्डे क्लब मधील विविध सेल | 72 |



ई मॅगेझीन अंक ३ JUNE-JULY 2022

# SATURDAY CLUB TIMES MAGAZINE

## स्वर्गीय माधवराव भिडे स्मृती विशेषांक

संचालक : सॅटर्डे क्लब ग्लोबल ट्रस्ट
संस्थापक : कै. माधवराव भिडे
संपादक : उपेंद्र साळवी
संपादकीय मंडळ : रश्मी गोखले, दिनेश थोरात, राजेश चौधरी, विद्या गोगटे, अनिल जोशी
कार्यकारी मंडळ : माधवी हातवळणे, केतकी बंकापुरे, स्मिता पाटील, तेजस चव्हाण कौस्तुभ भंडारी, शिवकला मुदलियार, चंदन नाईक, शुभम कुंभार, भावना अत्रे, प्रमोद कोणकर



सॅटर्डे क्लबच्या अंकामध्ये प्रसिध्द झालेला मजकूर आणि फोटो यांचे कोणत्याही स्वरुपात पुनर्मुद्रण करण्यास मनाई आहे.

**- संपादक**



प्रकाशक : सॅटर्डे क्लब ग्लोबल ट्रस्ट

**Cover-page Designed By**
**Mr. Chandan Naik, Malad Chapter**



**या अंकात लेख व जाहिरातींसाठी संपर्क साधा :**

**९६१९००७६०६**

**Email : scgttimes@gmail.com**



खाजगी वितरणासाठी

एकमेकां साह्य करू । अवघे होऊ श्रीमंत ।।

SATURDAY CLUB GLOBAL TRUST
Regn. No. E-26480 (Mum)
www.scgt.org.in

# RESPECTED TRUSTEES




**Shri. Ashok V. Dugade**
Chairman & Managing Trustee
SCGT



**Shri. Pradeep M. Tamhane**
Managing Director
Wincoat Colours & Coatings Pvt. Ltd.



**Dr. Suresh Kashinath Haware**
Managing Director
Haware Builders & Developers



**Shri. Ravindra Prabhudesai**
Managing Director
Pitambari Products Pvt. Ltd.



**Dr. Ajit Marathe**
Managing Director
Nirman Realtors & Developers



**Shri. Vijay Paranjape**
Ex. Siemens,
Business Consultant

# BOARD OF DIRECTORS

SATURDAY CLUB GLOBAL TRUST
Regn. No. E-26480 (Mum)
www.scgt.org.in



**SHRI NARENDRA BAGADE**
Director
Pitambari Agro Tourism



**SHRI ATUL ATRE**
Founder
Laser Telesystems Pvt. Ltd.



**SHRI MILIND PATIL**
Founder
Denfab



**SHRI SANTOSH PATIL**
Director
UKs Resort



**SHRI SHAILENDRA THATTE**
Advocate
Shailendra Thatte & Associates



**SHRI CHHABIRAJ RANE**
Managing Director
Chhabi Electricals



**ER. SANGRAM LIMAYE**
Chairman
Sangramsiddhi Pvt. Ltd.

# सॅटर्डे क्लब ग्लोबल ट्रस्ट

सॅटर्डे क्लबची स्थापना भारतातील सुप्रसिध्द ब्रिज इंजिनिअर स्व. माधवराव भिडे यांची, त्यांनी सॅटर्डे क्लबची चळवळ २००० साली सुरु केली. महाराष्ट्रीयांनी उद्योगव्यवसायातून लक्ष्मीची उपासना करावी, एकमेकांना मदत करुन व्यवसायवृध्दी करावी. श्रीमंती हे उद्योजकाच्या प्रगतीचे प्रतिक आहे, त्यामुळे अधिकाधिक मूल्याधारीत आर्थिक प्रगतीसाठी आपण आपली मानसिकता बदलण्याची गरज आहे. त्यासाठी सर्वांनी एकत्र येण्याची आवश्यकता आहे.

सॅटर्डे क्लबची संकल्पना **''एकमेकां साह्य करु अवघे होऊ श्रीमंत''** या घोषवाक्यात प्रतित होते.

**सॅटर्डे क्लबच्या उद्दीष्टांबद्दल बोलायचे झाल्यास -**

- **परस्पर सहकार्यावर आधारीत महाराष्ट्रीयन व्यावसायिकांचे अर्थपूर्ण जाळे विणणे.**
- **नवीन व्यवसाय सुरु करण्यासाठी उत्तेजन देणे.**
- **श्रीमंत व एकसंघ महाराष्ट्रीयन व्यावसायिक समाजाची उभारणी करणे.**
- **महाराष्ट्रीयन समाजाची व्यावसायिकतेबद्दलची मानसिकता बदलणे**
- **सहसदस्यांच्या उत्पादन व सेवांना बाजारपेठ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे.**
- **सदस्यांनी एकमेकांना नियमित भेटणे.**
- **व्यावसायिक संधींची देवाणघेवाण करणे.**
- **सदस्यांच्या व्यावसायिक अडचणींवर मात करण्यासाठी सहकार्य करणे.**
- **सदस्यांना परस्पर फायद्याचे व्यावसायिक करार करण्यासाठी उद्युक्त करणे.**

अशी दमदार संकल्पना, संस्थापक स्व. भिडेसाहेबांचे कुशल व प्रभावी नेतृत्व आणि समर्पित कार्यकर्त्यांच्या प्रचंड योगदानातून अल्पावधीतच क्लबच्या सदस्यांमध्ये उत्पादक, व्यावसायिक, तंत्रज्ञ, सल्लागार व विविध सेवा पुरविणारे इ. चा समावेश झाला आहे. क्लबच्या कारभारावर विश्र्वस्त मंडळाची देखरेख असते. विश्वस्त मंडळाचे सभासद आहेत.

**श्री. अशोकजी दुगाडे - विश्र्वस्त आणि कार्यकारी संचालक**
**माजी कार्यकारी संचालक बँक ऑफ महाराष्ट्र आणि इंडियन ओव्हरसीज बँक**
**श्री. प्रदिपजी ताम्हाणे - विश्वस्त आणि व्यवस्थापकीय संचालक विनकोट कलर्स अँड कोटिंग्स प्रा. लि.**
**श्री. रविंद्रजी प्रभुदेसाई - विश्वस्त आणि अध्यक्ष पितांबरी प्रॉडक्टस् प्रा. लि.**
**डॉ. अजित मराठेजी - विश्वस्त आणि व्यवस्थापकिय संचालक निर्माण ग्रुप**
**डॉ. सुरेशजी हावरे - विश्वस्त आणि जेष्ठ अणुशास्त्रज्ञ व संचालक, हावरे बिल्डर्स**
**श्री. विजयजी परांजपे - विश्वस्त आणि माजी संचालक, सीमेन्स आणि बिझनेस कन्सलटन्ट**
**सेक्रेटरी जनलर श्री. विनीत बनसोडे - द ग्रॅफोलॉजी रिसर्च इन्स्टिटयूट**

या विश्र्वस्त मंडळाबरोबरच CGB व CGC चे सक्रिय सभासद, अशा स्वरुपात संघटनेची दमदार वाटचाल सुरु आहे. आता वेळ आहे येणाऱ्या संधीचा वेध घेण्याची आणि त्याचा उपयोग करुन आपला उद्योगधंदा वाढविण्याची, आपली कार्यकारीणी सभासदांच्या व्यवसायवृध्दीसाठी सतत प्रयत्नशील आहे. मित्रहो, बरेच काही करावयाचे आहे. आपली कार्यकारीणी या दृष्टीने काम करण्यासाठी कटीबध्द आहे. या उपक्रमात आपल्या सर्वांच्या सक्रिय पाठींब्याची गरज आहे. एकीची वज्रमुठ आपल्या सर्वांच्याच आर्थिक व व्यावसायिक उन्नतीसाठी निश्चितच उपकारक ठरेल.

**चला तर.....उद्योग व्यवसायाच्या वाढीतून धनवृध्दीचा दृढसंकल्प करुन त्यानुसार कामाला लागूया.**

## सॅटर्डे क्लबच्या नावाचा पहिला नामफलक (बोर्ड)
## - श्री. अशोकराव दुगाडे



संस्थेचे संस्थापक आणि पितामह स्वर्गीय माधवराव भिडे हयांच्या व्यक्तीमत्वाचे अनेक पैलू होते. त्यावर जर आपण बोलायला गेलो तर कदाचित शब्द हि अपुरे पडतील. माणसे जोखायची कला त्यांना चांगलीच अवगत होती. एखादा माणूस कशात पारंगत आहे आणि त्याचा उपयोग एका चांगल्या उपक्रमात कसा करुन घायचा ह्यात त्यांची हातोटी होती. त्यांची आणि माझी पहिली भेट बँक ऑफ महाराष्ट्रच्या वरळी शाखेत झाली, मी त्यावेळी त्या शाखेचा ब्रँच मॅनेजर होतो. पहिल्याच भेटीत त्यांनी माझ्यावर कौतुकाचा वर्षाव केला होता. एवढया कमी वयात तू बँकेच्या एका उच्च पदावर आहेस हे पाहून मला तुझा अभिमान वाटतो. त्यांच्या त्या पहिल्याच भेटीत माझ्या त्यांच्याशी तारा जुळल्या. नंतर त्याच्या आणि माझ्या भेटीगाठी होत गेल्या ज्यात त्यांच्या मुखी बऱ्याच वेळेला एक गोष्ट असायची कि खूप सारे किर्लोस्कर, दांडेकर असे मराठी उद्योजक घडले पाहिजेत. आपण काही तरी केले पाहिजे. मी नंतर काही वर्षे नोकरी निमित्त मुंबई बाहेर होतो. त्यानंतर माझी मुंबईला बदली झाली आणि शिवाजी पार्क येथे मला बँकेतर्फे राहण्यासाठी जागा मिळाली. भिडे साहेबांना जेव्हा कळले तेव्हा त्यांनी मला हक्काने सांगितले की तुझ्या घरी दर महिन्याला मराठी उद्योजक कसे घडवता येईल ह्यासाठी भेटायचे. त्यावेळी आमच्या त्या भेटी शनिवारच्या होत असत. मराठी माणूस साधारणतः शनिवारी मौजमजा करतो, चित्रपट, नाटके पाहतो त्याच्याऐवजी मराठी माणसाने व्यवसायाबद्दल किंवा पैसे कसे कमवायचे, कश्याप्रकारे त्यात वृध्दी करायची ह्याबद्दल बोलायचे असे ठरले आणि त्याचे सॅटर्डे क्लब हे नामकरण झाले. मग १५ दिवसांत कधी शिवाजी पार्क ला तर कधी माझ्या घरी आम्ही समविचारी लोक भेटु लागलो.

मी त्यावेळी म्हणजे साधारण १९९०-९१ च्या काळात बँकेच्या संगणक क्षेत्राचा प्रमुख होतो, भिडे साहेबांना हे ठाऊक होते. एक दिवस त्यांनी मला सांगितलं कि ''अशोक, तू एका मोठया पेपरवर आपल्या संस्थेचे नाव प्रिंट करुन आणशील का?'' त्यावेळी सुध्दा भिडे साहेबांनी फक्त बोलायचे आणि ती आज्ञा समजून आम्ही पुर्ण करत असू. मी एका डबल पेपरवर सॅटर्डे क्लब मुंबई असे प्रिंट केले आणि एका पिवळया पुठया वर ते चिकटवले. तो प्रिंट केलेला नामफलक (बोर्ड) मी आमच्या मिटिंगला घेऊन आलो आणि आम्ही बसलो होतो त्याच्या मध्यभागी त्याला लटकावले. तो बहुधा क्लबचा पहिलावहिला बोर्ड पाहून भिडे साहेबांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद दिसला. त्यांनी मला शाबासकी तर दिलीच पण म्हणाले आता औपचारिकरित्या संस्था सुरु करण्याची वेळ आली आहे. कदाचित त्या पहिल्या नामफलकाने संस्थेचे बीज रोवले गेले होते.

भिडे साहेबांचे असे अनेक अनुभव आहेत, एक एक अनुभव आठवला तरी मनाला नवचैतन्य तसेच खूप ऊर्जा मिळते. आज भिडे साहेब जरी ह्या जगात नसले तरी त्यांच्या त्या थोरविचारांनी, त्यांनी दाखवलेल्या मार्गावरुन आपल्याला मार्गक्रमण करायचे आहे सॅटर्डे क्लबचा विस्तार करायचा आहे. फक्त महाराष्ट्रातच नाही भारतातच नाही तर जगभरात त्याला पोचवायचे आहे. हे जर आपण सर्वांनी आपले ध्येय ठेवले तर आजच्या ह्या कृतज्ञता दिवसाला भिडे साहेबांना ती खऱ्या अर्थाने आदरांजली असेल.

**श्री. अशोक दुगाडे**

अध्यक्ष आणि कार्यकारी विश्वस्त, सॅटर्डे क्लब ग्लोबल ट्रस्ट




## : Product Range :

- Battery Charger - SCR Based
- Modular SMPS DC System ● DC TO DC Converter
- Solar Charge Controller ● Battery Maintenance Equipment
- AC/DC Distribution Boards ● Voltage Stabilizer
- Transformer ● Energy Saving Equipment - STABILUX
- Annunciation Systems ● Cathodic Protection
- Control Panels ● Protective Relays
- Inverters / UPS ● Traction Battery Chargers
- Cell Boosters ● Servo Voltage Stabilizer
- Load Battery Discharge Bank ● LED Lighting Products
- Power Factor Controller ● Earth Leakage Monitoring System
- Traders for : Battery

(Lead Acid - Tubular & Plante, VRLA (SMF), NI-CD)






# Chhabi Electricals Private Limited

Since 1985

**HO & Regd Office :** E-66, MIDC Area, Jalgaon 425 003 (M.S.) INDIA
Tel : +91 257 2210626 / 27 / 28, Email : marketing@chhabi-india.com
**Mumbai Office :** 609, Excellencia, Lodha Supremus, MIDC, Wagle Estate, Road No 22, Thane (W) 400 604, Tel : +91 22 2581 2591 / 9

Product Quality Delivery and Service 100% Reliability



वास्तुशास्त्रं प्रवक्ष्यामि लोकानां हितकाम्या:।।

Raise the quality of life, with 'Vastu Aarogyum'...



Vastu Aarogyum is a one-stop solution for all your Vastu related concerns.
We help you to lead a healthy, happy & prosperous life with our globally renowned concept of 3Ps & 3Hs.
Come, let's live life to the fullest with the abundance of health & happiness!

VASTU AAROGYUM'S KEYS TO ABUNDANCE

**3Ps**

- **Peace** – Acquire a state of inner peace for the biggest success with the help of Vastu.
- **Prosperity** – Vastu is the key towards prosperity for home, business & ultimate satisfaction.
- **Progeny** – Vastu is the source to have a healthy, serene, humble & ideal child.

**3Hs**

- **Health** – Vastu takes care of your wellness by boosting physical, emotional and spiritual health.
- **Harmony** – Harmony in relationships can be attained by the means of Vastu.
- **Happiness** – Obeying the principle of Vastu delivers auspicious happiness to all living around you.

www.vastuaarogyum.com

## Our Services

- Vastuoorja & Vastu shastra Consultation
- Planning & Designing of Residential / Commercial Buildings as per Vastu Shastra
- Vastu Dosha Nivaran / Vastu Energy Treatment
- Geopathic Stress Detection & Treatment
- Dowsing & Water Dowsing
- Training in Vastu Shastra & Energy Sciences
- Human & Earth Energy Scanning

Dr. Avinash Kulkarni's

# VASTU AAROGYUM™

Abundance of Health & Happiness

OLIVES – Online Learning Institute of Vastu & Energy Sciences

My Vastu Shopy – My Vastu Shopy Is Store Where We Offer Various Products Which Are Based On Our Indian Ancient Sciences To Enhance The Positive Energies In Vastu. Our Products Are Combination Of ia Culture,Tradition & Sciences

Future Pandiit – Design Your Destiny

FOR APPOINTMENTS AND FRANCHISEE CALL :
94035 70270, 93724 95999, 70206 45156

**Head Office :** 'Vastu Aarogyum', Nr. Gajanan Maharaj Temple, Mohadi Road, Jalgaon
**Overseas :** • Russia • Australia • Singapore • Italy • Germany • USA
**India :** • Delhi • Punjab • Gujarat • M. P. • Maharashtra & Goa • Karnataka • Uttar Pradesh

KEEP IN TOUCH WITH US : VastuAarogyumOfficial | Vastu Aarogyum | vastuaarogyum

# भिडे साहेब व्यक्ती नाही वल्ली
## - डॉ. अजित मराठे

SATURDAY CLUB GLOBAL TRUST
www.scgt.org.in



**भिडे सरांबद्दल बोलायचं तर शब्द कमी पडतील पण त्यांच्याबद्दल बोलून पूर्ण होणार नाही. ते माझे गुरु होते, माझे प्रेरणा स्थान होते.**

सिव्हिल इंजिनीअरिंग हा आम्हा दोघांमधला सामायिक दुवा होता आणि कदाचित त्यामुळेच आम्ही जास्त जवळ आलो. थोडा थोडका नाही तर १५-१८ वर्षांचा त्यांचा जवळून सहवास मला लाभला हे माझं मोठं भाग्य आहे.

या इतक्या वर्षांमध्ये त्यांचे अनेक पैलू मला जाणवत गेले. अफाट व्यक्तिमत्वाचा हा माणूस.

अतिशय कविमनाचे आणि खिलाडू वृत्तीचे होते भिडे सर. आमच्या गप्पांमध्ये त्यांच्या कविता, त्यांनी लिहिलेली टिपणं, त्यांच्या डायऱ्या हे सगळे विषय असायचे. तुम्हांला खोटं वाटेल पण हजारो उद्योजकांच्या त्यांच्या वैशिष्ट्यांसकट त्यांनी नोंदी केलेल्या होत्या ज्याचा सॅटर्डे क्लब स्थापन करताना फार उपयोग झाला. नुसत्याच नोंदी नाहीत तर हा माणूस म्हणजे सदैव 'Man-in-Action' असायचा. एखादी गोष्ट पटली की ताबडतोप action. मराठी बिल्डर्सची माटुंगा जिमखाना इथे झालेली पाहिली मीटिंग हे या Action चेच उदाहरण. भराभर माझ्यासमोर कित्येक प्रतिष्ठित बिल्डर्सना फोन करुन, तारीख ठरवून अफाट गतीने त्यांनी ही मीटिंग घडवून आणली.

त्यांना प्रवासाची देखील प्रचंड आवड. खासकरुन सॅटर्डे क्लबसाठी प्रवास करायचा असेल तर एका पायावर हा माणूस तयार असायचा. जिथे जातील तिथे सॅटर्डे क्लबची स्थापना ते करत गेले. त्यांच्या हव्याहव्याशा वाटणाऱ्या या उत्साहामुळे त्यांची ही प्रवासाची सवय क्लबमधल्या इतर सगळया लीडर्सना देखील लागली आणि मला वाटतं सॅटर्डे क्लब वाढण्यासाठी त्याचा खूप उपयोग झाला.

या सगळयाबरोबरच हा माणूस तितकाच प्रचंड मनस्वी. एखादा माणूस आवडला की त्याला मर्यादा सोडून ते मदत करत. त्यात मी देखील आलो. पण जर का एखाद्याचं वागणं आवडलं नाही किंवा तो चुकीचा वाटला तर त्याला खडयासारखं बाजूला करुन जवळपास देखील फिरकू देत नसत. वास्तविक अशा मनस्वी माणसाबरोबर संसार करणं कर्मकठीण! पण सौ. इरावती भिडे यांनी ती जबाबदारी लीलया पार पाडली. नुसता संसारच नाही तर सरांचे सारे आर्थिक व्यवहार देखील त्या व्यवस्थित सांभाळत गेल्या. सरांचं यात वैशिष्ट्य हे की ते कित्येक सभांमध्ये सपत्नीक जायचे आणि आपल्या पत्नीचं भर सभेत मुक्तकंठाने कौतुक करायचे आणि हा आदर केवळ तोंडदेखला नसायचा. हिच्यामुळेच मी कणखरपणे उभा आहे हे सांगताना पुरुषी अहंकाराचा लवलेशही त्यांच्यात नसायचा. सगळयाच पुरुषांनी शिकण्यासारखी ही गोष्ट आहे.

सरांचा स्वभाव, त्यांचे वागणं बोलणं, त्यांचे Passion in the heart या सगळयामुळे ते पुलंच्या भाषेत सांगायचं तर व्यक्ती नाही तर वल्ली म्हणून जगले. या सगळयाचा याची देही अनुभव घ्यायला मला मिळाला, खरंच मी भाग्यवान आहे.

**डॉ. अजित मराठे**

निर्माण ग्रुप

❖❖❖

# ADDING **POWER** AND **SMOOTHNESS** TO YOUR CASTER WHEEL

Pivot Pin, Axle Pin, Rivets
and many more for caster wheel



METAFORGE
Engineering (I) Pvt. Ltd.

Manufacturer of cold forging parts
and wide range of non-standard fastener

For More Details Contact

**Mr. Prajakt Mehta**

9225110805 | prajakt@metaforgeindia.com
www.metaforgeindia.com

# मराठी उद्योजकता दिवसाच्या हार्दिक शुभेच्छा



इंजि. माधवराव भिडे
संस्थापक - सॅटर्डे क्लब ग्लोबल ट्रस्ट

१२ जुलै
## मराठी उद्योजकता दिवस

|| एकमेकां सहाय्य करु | अवघे होऊ श्रीमंत ||

Proud Member Of
**Saturday Club Global Trust**

## MR. VISHAL MANDLIK

**SCGT Kolhapur Region Head**

Yama

## YAMA ENGINEERS AND TESTING INSTRUMENTS PVT. LTD

+91 (0231) 2690766 I +91 99226 44499
www.yamaengineers.com



# माधवराव भिडेसाहेब...माझे दैवत

**नरेंद्र ह. बगाडे**

**प्रत्येकाच्या आयुष्यात कुणीतरी अशी एक व्यक्ती येते आणि ती व्यक्ती संपूर्ण आयुष्यावर प्रभाव टाकते आणि संपूर्ण आयुष्यच पूर्णपणे बदलून जाते.**

मी तिसरी कि चौथीत असेन माझे वडील एका ऑर्केस्ट्राला घेऊन गेले होते. कार्यक्रम अतिशय नीटनेटका आणि बहारदार होता. प्रेक्षकांमध्ये अचानक हालचाल झाली. बडा साब आया बडा साब आया अशी चर्चा सुरु झाली. थोडयाच वेळात तो गोरागोमटा सफारी घातलेला बडासाब मंचावर आला. कार्यक्रमात आलेल्या सर्व लोकांचे आणि कलाकारांचे अभिनंदन करुन मंचावरुन खाली उतरला. मी वडिलांना विचारले कोण हा बडा साब? वडील म्हणाले ते या कार्यक्रमाचे आयोजक आहेत भिडेसाहेब. लहानपणीच ती मूर्ती मला मनाला भावली. नियतीने मला माझ्या देवाचे पहिले दर्शन घडविले होते. त्यावेळी मला पुसटशी शंकाही आली नाही की, या माणसामुळे माझ्या आयुष्याला दिशा मिळेल. त्यानंतर जवळजवळ ४० वर्षांनी माझी आणि त्यांची पुन्हा भेट झाली आणि माझे आयुष्यच बदलून गेले.

सॅटर्डे क्लब मध्ये जबाबदाऱ्या घेऊन काम करताना भिडेसाहेबांचा सहवास मिळत गेला. भांडुप चॅप्टरची चेअरमन म्हणून जबाबदारी घेतल्यावर उद्घाटनप्रसंगी भिडेसाहेबांनी शाब्बास नरेंद्र म्हणून ठेवलेला हात आजही आठवला कि, अंग मोहरुन येते. दहा हत्तींचं बळ अंगात येत. सातत्याने प्रेरणा मिळत रहाते. या प्रेरक नेतृत्वामुळेच नवनवीन जबाबदाऱ्या यशस्वीरीत्या पूर्ण करण्याच्या उद्देशाने घेत गेलो. प्रत्येक वेळी भिडेसाहेब ठामपणे माझ्या पाठीशी उभे राहिले.

भिडे साहेबांचे स्वप्न होते की, पंचतारांकित हॉटेलमध्ये सॅटर्डे क्लबच्या कार्यक्रमात किमान १००० मराठी उद्योजक एकत्र आले पाहिजेत. माझ्या देवाची इच्छा पूर्ण करण्याच्या उद्देशाने कामाला लागलो. निवडक सहकाऱ्यांच्या मदतीने १,१८० मराठी उद्योजक एअरपोर्ट जवळील 'द ललित' या हॉटेलमध्ये एकत्रित करण्यात आम्ही यशस्वी झालो. त्यादिवशी त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद मी माझ्या शेवटच्या क्षणापर्यंत विसरु शकणार नाही. माझ्या देवाची एक इच्छा मी पूर्ण करु शकलो होतो. खरं म्हणजे भिडेसाहेबांची इच्छाशक्ती इतकी प्रबळ असायची की, प्रत्येक गोष्ट यशस्वी व्हायचीच. भिडेसाहेबांची स्वतःच्या विचारांवर प्रचंड श्रध्दा असायची. सॅटर्डे क्लबवर, क्लबचे काम करणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्यांवर निर्मळ प्रेम असायचे तसे ते व्यक्तही करत. कुठल्याही कार्यक्रमात प्रत्येकाची आपुलकीने चौकशी करत. त्यामुळे कार्यकर्ते खूश असत आणि म्हणूनच निष्ठावान कार्यकर्त्यांची मोठी फौज उभी राहिली.

भिडेसाहेबांचा आग्रह असायचा की, जास्तीत जास्त महिलांनी व्यवसाय करावा. त्यासाठी ते सतत प्रयत्नशील असत. साठेताईंना दुबईला दिड लाख पुरणपोळयांची ऑर्डर मिळावी म्हणून त्यांनी केलेल्या प्रयत्नांचा मी साक्षीदार आहे. ऑर्डर पूर्ण झाल्यावर भिडेसाहेबांना किती कौतुक, प्रत्येक ठिकाणी ती यशोगाथा सांगत. भिडेसाहेबांच्या अनेक गुणांमधला मला भावलेला गुण म्हणजे दुसऱ्यांचं मनापासून कौतुक करणे. त्यात कुठेही अनैसर्गिकपणा नसायचा.

मी आणि विनित बनसोडे भिडेसाहेबांच्या शेवटच्या सहा महिन्यात जवळपास रोज एकत्र असायचो. आम्हा दोघांवर त्यांचं खूप प्रेम. आम्ही दोघेही नशीबवान आहोत की, त्यांच्या प्रेमाची अनुभूती नियतीने करुन दिली. भिडेसाहेब नेहमी म्हणत, तुम्ही दोघेही माझ्या मनातला क्लब खऱ्या अर्थाने जगताय...त्याच प्रेरणेने आयुष्यभर क्लबचे काम करत राहणार...भिडेसाहेब आता आपल्यात नाहीत पण मला सतत वाटत असते की. ते माझ्यासोबतच आहेत.

**भिडेसाहेबांना कृतज्ञतापूर्वक नमस्कार**

❖❖❖

# SHUBHAM ELEVATORS

Elevating Lives Safely...!




It's our privileged to introduce our expertise in Elevator eras, precisely with all leading brands in India, such as **OTIS, KONE, THYSSENKRUPP, SCHINDLER** etc. **(all types Passenger,Car,Stacker Parking, Goods Elevators and Escalator)** since last two decades.

Safety and satisfaction of our clients are enhancing actual assets of our company

## NEWLY STARTED

**EXTRAORDINARY 30 MINUTE COACHING FOR ELEVATORS SAFETY & USES**

**Please feel free to call us on –**

**8108000590 / 8108829333 / 8108747888**

**You can also mail us your any queries regarding Elevator, Escalator and Stack Parking - Car parking on**

**@ service@shubhamelevators.com  www.shubhamelevators.com**




### Group Tours

***SUPER SAVER OFFER***

Up to **10%** off on all group tour prices

### Customized Tours

Tailor - made tour packages to any **domestic** or **international** destination

### Visa and Forex

Up to **50%** off on service charges for **Passport and Visas** (for SCGT members)

### Hotels and Flights

Best rates on **last minute flights** to major cities

Proud member of Saturday Club **Nigdi Chapter**

For more **discounts**, **offers** and other details

**Call now**

**960 77 88 997**

**Rishikesh Musmade**
Co-founder and CEO
Musmade Hospitality Pvt. Ltd



# मराठी उद्योजकता दिवसाच्या हार्दिक शुभेच्छा



इंजि. माधवराव भिडे
संस्थापक - सॅटर्डे क्लब ग्लोबल ट्रस्ट

१२ जुलै

## मराठी उद्योजकता दिवस

|| एकमेकां सहाय्य करु | अवघे होऊ श्रीमंत ||

Proud Member Of
**Saturday Club Global Trust**

UK's
RESORT, KHOPOLI
The Break you deserve

UK's Resort,
Khopoli

**98220 12343**
**87798 14559**

www.uksresort.com info@uksresort.com

**AN IDEAL RESORT NEAR MUMBAI - PUNE FOR ONE DAY PICNIC, OVERNIGHT PICNIC AND CONFERENCES.**

KITCHEN TREATS
Fine Dining Products

# YOUR KITCHEN PARTNER



■ 100% PURE MELAMINE FINE DINNING PRODUCTS
■ FDA APPROVED ■ NASA CERTIFIED
■ MICROWAVE DISHWASHER SAFE

ektra® by Superware
100% Melamine Tableware

BOOK YOUR ORDER TODAY
CONTACT: +91 98195 54188

# EXERTION HR SOLUTIONS PVT. LTD.

Empowering India for Employability

Your Compliance Partner




**Registrations Under All Labour Law**

- ❖ Shop & Establishment
- ❖ PF, ESIC, MLWF & PT
- ❖ Factory License
- ❖ Labour Contract License
- ❖ BOCW License



**Statutory & Labour Law Compliances**

- ❖ PF & ESIC Compliance
- ❖ Professional Tax
- ❖ Statutory Audit
- ❖ PF Inspection
- ❖ Show cause notices
- ❖ like 7A in PF & ADHOC C 18 in ESIC




**Payroll Management**

- ❖ Payroll Processing
- ❖ Salary Structure Creation
- ❖ Prepare Form 16 (Including Part A&B)
- ❖ MIS Report
- ❖ Salary Register
- ❖ PF, ESI & PT Reports
- ❖ Leave Balances, Accruals & Utilization
- ❖ Web based Solution

**Contract Staffing (Benefits)**

- ❖ Candidates for all business sectors
- ❖ Meet your seasonal needs
- ❖ No long hiring process
- ❖ Keeps resources cost low
- ❖ Skilled resources with long-term potential
- ❖ No long-term commitment
- ❖ Convert permanent hire on your discretion
- ❖ Access skilled resource rapidly
- ❖ Stay agile & flexible
- ❖ Easily respond to fluctuating workload.

**Permanent Recruitment**

- ❖ Our Primary Service
- ❖ Requisition Request Sent
- ❖ Source Passive And Active Candidates
- ❖ Phone Screen Potential Candidates
- ❖ Develop a Candidate Profile And Submit To Client
- ❖ In Person Interview



**REGISTERED OFFICE**

Pune: Kumbare Brothers, Near Sidhivinayak Temple, Azad Nagar, Kothrud, Pune – 411038.

**CORPORATE OFFICE**

Mumbai: 507 Office, Swastik Disha Corporate Park, Opp. Shreyas Cinema, Ghatkopar (W), Mumbai - 400086.

**GAYATRI CHAVAN: 8599946333 | JAY SHAH: 9167121333**

# भिडे साहेबांना ज्यांनी घडविले ते नाना आणि आई

SATURDAY CLUB GLOBAL TRUST
Regn. No. E-26480 (Mum)
www.scgt.org.in



**कामामध्ये सातत्य, कामास तडीस न्हेणे, नवनवीन उद्धीष्ट्ये घेणे, नाउमेद न होणे, उद्योजकता असे अनेक गुण त्यांना नाना आणि आई कडून मिळाले.**
**भिडे साहेबांनी अनेकांचे आयुष्य घडवले पण भिडे साहेबांना ज्यांनी घडवले ते त्यांचे वडिल (नाना) आणि त्यांच्या आई हयांच्याबद्दल भिडेसाहेबांचे अनुभवकथन**
**(संदर्भ - माणसे घडवणाऱ्याची गोष्ट - भिडे साहेबांचे आत्मचरित्र)**

आम्ही उरणला गेलो त्यावर्षी मी नववीला होतो. नानांसाठी हेडमास्टरशिपचं ते पहिलंच वर्ष होतं. शाळेच्या विकासासाठी त्यांनी पहिल्या दिवसापासूनच कंबर कसली. शाळेला स्वतःची इमारत नव्हती. तळमजल्यावर इतर भाडेकरुंची राहती घरं आणि वरच्या मजल्यावर, भाडेकरु असणाऱ्या शाळेचे वर्ग अशी ती चाळीची इमारत होती. तिच्या मागे-पुढे ग्राऊन्ड नव्हतं. लागून गटार होतं. गटारालगत रस्ता होता. रस्त्यापलीकडे मोकळी जागा असा भवताल होता. त्या मोकळया जागेत मुलं खेळायची. 'शाळेला स्वतःची स्वतंत्र इमारत हवी आणि ती बांधणं हे हेडमास्तर म्हणून माझं कर्तव्य आहे हे शाळेच्या पहिल्या दिवशी नानांनी शाळेत आणि घरात जाहीर करुन टाकलं आणि कामाला लागले. गावातले व्यापारी, प्रतिष्ठित लोक यांच्याकडे हररोज संध्याकाळी जाऊन ते ओळख करुन घेऊ लागले. साखरेचे ख्यातनाम कारखानदार सर होरमसजी भिवंडीवाला हे गर्भश्रीमंत पारशी गृहस्थ मलबार हिल, मुंबईला राहात होते. अर्ध उरणगाव त्यांच्या मालकीचं होतं. उरणमध्ये त्यांच्या मालकीची शेकडो एकरांची फुलबाग, फळबाग होती. बंगला, गेस्ट हाऊस होतं. बागांत हरणं, ससे असे अनेक प्राणी पाळलेले होते. चाळीसहून अधिक माळी बागकामाच्या चाकरीत होते. इंग्रज राजवटीत 'सर' ही पदवी मिळवलेल्या होरमसजी भिवंडीवालांचं मुंबईच्या चिराबाजारात ऑफिस होतं. त्यांच्याविषयी अशी माहिती मिळाल्यावर, आरंभीच्या दिवसांतच नाना सर होरमसजींच्या भेटीसाठी चिराबाजारात गेले.
तुम्ही 'गावशेठ' आहात. उदार हस्ते गावासाठी देणगी द्यावी अशी नानांनी विनंती केली. पुन्हा पुन्हा जाऊन विनंती करत राहिले. उरणहून चिराबाजारात जाणं सोपं नव्हतं. उरणहून सहा किलोमीटर्सवरच्या पोरबंदरला टांग्याने जायचं, तो नसेल तेव्हा चालत जायचं, तिथून लॉंचने भाऊच्या धक्क्यावर जायचं, तिथून बसने चिराबाजारात जायचं अशा प्रवासाला किमान तीन तास लागायचे. तिथे गेल्यावर तर होरमसजींची लगोलग भेट मिळायची नाही. ताटकळत ठेवलं जायचं. पण थकतील ते नाना कसले ? संततधारेने दगडही मृदू होऊन अंतरंग उकलून दाखवतो ही त्यांची धारणा कृतिसंपन्न होती. होरमसजींच्या भेटींना कित्येकदा जाऊनही मदत वा आश्वासन मिळालं नाही. नानांनी मिशनचा मार्ग बदलला, त्यांनी अलिबागला धाव घेतली. कोठावाला नावाचे पारशी गृहस्थ कलेक्टर होते. त्यांना भेटून, त्यांना उरणला आणण्याचा नानांनी घाट घातला. मी दहावीला असतानाची उरणच्या सार्वजनिक हॉलमध्ये झालेली कोठावाला साहेबांची सभा मात्र मी पाहिलेली होती. गावातले शंभरेक प्रतिष्ठित पुरुष उपस्थित होते. नानांनी मला मदतीला म्हणून सभेला नेलं होतं. कलेक्टर कोठावाला, कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष डी. भी. म्हात्रे, हिंदुमहासभेचे श्रीयुत जुवेकर आणि उरणचे कित्येक श्रीमंत व्यापारी त्या सभेला आले होते. नानांनी प्रास्ताविकाचं भाषण केलं.
शाळा उत्तम, आदर्श असेल, म्हणजे मुळात तिला स्वतःची इमारत असेल, मुलांसाठी लायब्ररी असेल, खेळण्यासाठी ग्राऊन्ड असेल तरच त्या शाळेत उत्तम, आदर्श विद्यार्थी घडू शकतील आणि तरच त्या गावाचं भवितव्य उज्ज्वल असू शकेल असं नानांनी सलामीलाच विधान केलं. ज्याला कोठावाला साहेबांनी मान डोलावली. इमारत बांधण्याचा गोवर्धन गावकऱ्यांनी आणि शासनाने उचलायला हवा असं नानांनी भावपूर्ण आवाहन केलं. निवडक गावकऱ्यांनी आपल्या भाषणात त्यांचा पुनरुच्चार केला. अध्यक्ष म्हणून सर्वांत शेवटी कलेक्टर कोठावालांचं भाषण झालं. शुध्द मराठीतून केलेलं भाषण मला आणि सर्वांना खूप आवडलं. ते म्हणाले, ''तुमच्या मुलाबाळांच्या भविष्याची कदर करणारा हेडमास्तर तुमच्या गावातल्या शाळेला मिळालाय, हे भाग्य समजा. मी आजवर कोणत्याही शाळेला भेट दिलेली नव्हती. भिडयांच्या शैक्षणिक तळमळीमुळे मी प्रभावित झालो, म्हणूनच इथे या शाळेच्या भेटीला आलो. भिडयांचे हात सर्वांनी बळकट करायला हवेत. शासन नियमांनुसार सर्व सहाय्य

देईल.''

त्यानंतर नानांचे प्रयत्न तेज झाले. सर भिवंडीवालांकडे चिराबाजारात जाण्याच्या खडतरपणालाही त्यांनी रजा दिली नव्हती आणि एका भेटीत नानांना त्यांनी सांगितलं, जे नानांनी घरी आल्यावर आम्हांला सहर्ष मुद्रेनं सांगितलं होतं.

''तुम्ही कितीवेळा आलात त्याची आमच्याकडे नोंद आहे. ही खेप चाळीसावी होती, त्या हिशोबाने मी तुम्हांला चाळीस हजारांची देणगी द्यायला हवी. पण गावच्या शाळेसाठीची तुमची तळमळ पाहता मी चार लाख देणार आहे. गावकरी जी मदत जमवतील ती आणि ही देणगी मिळूनही रक्कम बांधकामाला अपुरी झाली तर या आणि अधिकची देणगी घेऊन जा.''


पुरेसे पैसे जमल्यावर, शाळेचा आराखडा बनवून घेणं. नाना शासकीय परवानग्या मिळवणं, कॉन्ट्रॅक्टर नेमणं, अशा कामांना वेळ गेला. नानांची तिथली कारकीर्द चार वर्षांची होती. त्या काळात, इमारतीच्या बांधकामाचा शुभारंभ झाला. भिती उभ्या राहू लागल्या.

❖❖❖

स्टेनो, स्टायपिस्ट, रिसेप्शनिस्ट, क्लर्क्स अशा नव्या स्टाफसह, नव्या डेकोरेशनमधल्या त्या ऑफिसचा शुभारंभ मी गुढीपाडव्याच्या दिवशी करुन घेतला. माझं सद्‌भाग्य होतं म्हणून तो शुभारंभ मला आईच्या शुभहस्ते करुन घेता आला. आईची विचारसरणी उद्योजकतानुकूल अशीच होती. माझ्या लहानपणी तिने टूथपावडर काढण्याचा घरगुती उद्योग सुरु केला होता. आयुर्वेदिक औषधांची विपुल माहिती असल्यामुळे, तुळसबी, अश्वगंधा, हिरडा, आदी बारा वनस्पतींमध्ये बकुळसाल हा मुख्य घटक होता. म्हणून आईने टूथपावडरीचं नावही बकुळ छाप आयुर्वेदिक दंतमंजन असं ठेवलं होतं. त्या नावाची तिने लेबलंही छापून घेतली होती. काचेच्या शेकडो बाटल्या आणल्या होत्या. औषधांच्या खरेदीसाठी दवाबाजारात जाण्याची शिस्त तिनेच मला लावली होती. वनौषधी आणून घरातल्या अगडबंब खलबत्त्यात कुटून, चाळून बनवलेलं मिश्रण काचेच्या बाटल्यांत भरुन -बकुळ दंतमंजना' ची लेबलं डकवण्याच्या कामात आई मला सहभागी करुन घेत होती. बाटल्या विक्रीला ठेवण्यासाठी मला कल्याणच्या दुकानांत पाठवत होती. 'फ्री सॅम्पल' च्या इवलाल्या बाटल्याही आईने त्या जुन्या काळी तयार ठेवल्या होत्या. ओळखीच्या माणसांना, दुकानदारांना त्या ती सढळ हस्ते देत होती. तिचा तो धूमधडाका, उत्साहाचा सोसाटा फार काळ दौडू शकला नव्हता. नानांची उरणला बदली झाल्यामुळे कल्याण सोडताना तिला तो उद्योगही सोडावा लागला होता. उरणला त्याची नव्याने घडी बसवणं हे वाढत्या संसाराच्या धबडग्यात साधलं नव्हतं. तरीही स्वतःतल्या गुणवत्तेचा, आवडीचा तिला विसर पडला नव्हता. मधे खूपखूप वर्ष गेली आणि नंतर डोंबिवलीला आमच्या 'आशिर्वाद'मधे स्थिरावल्यानंतर तिने मोत्यांचे आणि सोन्याचे तयार दागिने विकण्याचा व्यवसाय खूप वर्ष केला होता. उरणचे आमचे घरमालक अप्पा उपाध्ये यांच्या मोठया मुलाची गिरगावात सोन्यामोत्यांच्या दागिन्यांची मोठी पेढी आणि शोरुम होती. त्यांच्याशी बोलून, त्यांच्याकडून तयार दागिने पूर्णपणे क्रेडिटवर घेऊन, कल्याण-डोंबिवली परिसरात ते विकण्याचा आणि अर्थार्जनाचा शिरस्ता तिने खूप वर्ष जपला होता. गिऱ्हाईक जोडून ठेवलं होतं, ते तिच्या मधुरवाणीच्या बळावर ! ती नेहमी म्हणायची,

**''वाणिया गोळ (गूळ) ना आपे. पण गोळ एवी वात करे छे.''**

हुषार व्यापारी कुणाच्या हातावर फुकट गुळाचा खडा कधीच ठेवत नसतो. फुकटात मिळालेली गुळासारखी गोड वाणी मात्र कायम वापरत असतो. असा मथितार्थ असणारी म्हण तिच्या तोंडात नित्य बसत होती. तिचा हातही 'दाता' होता. पण व्यावसयिकतेची आस मनात कायम जागी होती. ती आसआवड आणि व्यावसायिकतानुकूल दृष्टिकोन माझ्याकडे अनुवंशाने आला असावा. म्हणूनच माझ्या मालकीच्या पहिल्यावहिल्या ऑफिसचा शुभारंभ आईच्या हस्ते करुन घेताना माझे मन समाधानाने भरुन आलं.



चि. सुहासचा डोंबिवलीच्या घरात साजरा झालेला पहिल्या वाढदिवस प्रसंगी डावीकडून . चि. राजीव, ती. नाना, माधवराव, चि. सुहास, ती. आई (फेब्रु. १९६४)


Spparkle bakers
we bake happiness
Pimpale Saudagar
for customised Cakes with variety of flavours in reasonable price to corporate companies also Bakery products
for more details n designs just call
9921300666 / 7276200666 / 9765132969
Joy Full of Sweet Moments


ELEKTRIKEXPRESS
Think Electric Think Elektrikexpress
Multibrand Electric Vehicles Platform
THINK ELEKTRIK
ELEKTRIKEXPRESS
Let's RESTORE GREEN
SWITCH TO ELECTRIC
7447638992
www.elektrikexpress.com

# KALPATARU GROUP

**Kalpataru consultant** is one of the leading Civil-Environmental Consultants based at various cities like Dombivli, Kolhapur and Sangli. Kalpataru consultant is an **Environmental, Civil Engineering, Architectural, Plumbing & Public Health Consultancy Firm.**

## We are expert at

- Waste Water Engineering & Consultancy Services. (STP & ETP)
- Water Treatment & Engineering - RO Softener.
- Environmental Impacts Assessment (EIA) & Environment Clearance. (EC)
- MPCB Consent to Establishment & Consent to Operate. (CTE & CTO)
- Air Pollution Control Service.
- Rainwater Harvesting Service.
- Turnkey Effluent Treatment System, AMC, Maintenance.
- Prefabricated Packaged Water & Waste Water Treatment System.
- Solid Waste Management.
- Personal Protective Equipment Trader.
- Environmental Monitoring Services.














## KALPATARU GROUP

1290, D Ward, Uttareshwar Peth, Kolhapur. 416002
Phone : +91 76204 10402, +91 96374 24802
Email : contact@kalpatarucons.com

**kalpatarucons.com**

**Branches : Kolhapur, Dombivli, Chakan.**

Get your younger look Back with

# SKIHA HAIR TRANSPLANT

No More Baldness Now



Hair Transplant



Alopecia Problem



Hair Loss



PRP Therapy

**हेअर ट्रान्सप्लांट** (तुमच्याच केसांची मूळ, तुम्हालाच परत, फक्त जागा बदलून)

- गेलेले केस परत येण्यासाठी plasma थेरपी.
- कोंड्यावरील उपचार.
- केस विरळ असल्यास त्यावरील उपचार.
- चाईवर उपचार.
- केसांच्या कोणत्याही समस्यांवर सल्ला व उपचार.

या पानाचा स्क्रीनशॉट दाखवा आणि घ्या

**FREE CONSULTATION**



Dr. Shruti's स्किहा SkiHa SKIN HAIR CLINIC

**Call us: +91 93726 61722 | 87793 31634**

**Add.:** 307, Srishti Square at Sonapur Signal, Bhandup (West)

SATURDAY CLUB GLOBAL TRUST
Regn. No. E-26480 (Mum)
www.scgt.org.in

# असेही भिडे साहेब

भिडे साहेबांमध्ये एक कलाकार हि दडला होता. रेल्वेत नोकरी करत असतांना त्यांनी अनेक नाटके बसविली होती आणि त्यात प्रमुख भूमिका ही केल्या होत्या. अनेक ऑर्केस्ट्रा तसेच गाण्याचे कार्यक्रम त्यांनी अरेंज केले होते. त्यातल्याच काही आठवणी.

**(संदर्भ - माणसे घडवणाऱ्याची गोष्ट - भिडे साहेबांचे आत्मचरित्र)**



चि. राजीव त्याची आई सौ. नलिनीसोबत ऑर्केस्ट्रात गाताना (१९७३)



'हिट्स ऑफ नौशाद' कार्यक्रमात : नौशाद, नलिनी, राजीव आणि माधवराव (१९७३)



माधवरावांनी अनेक नाटकांत नायकाचे काम केले. अशा एका नाटकाच्या प्रयोगाच्या वेळी मित्रवर्य व प्रख्यात नाट्यनिर्माते श्री. मोहन वाघ, मानलेली बहीण व लेखिका सौ. सुधा सोमण व तिचे पती श्री. वसंतराव सोमण, महा. सेवा. पोलीस महासंचालक (१९७०)

माधवरावांनी स्थापन केलेल्या 'रेल्वे ललित कला मंडळ' संस्थेच्या 'तीन चोक तेरा' नाटकात नायक म्हणून काम करताना (ऑक्टो. १९६५)





मोरादाबाद येथे डिव्हिजनल एक्झिक्युटिव्ह इंजिनीअर, उत्तर रेल्वे असतांना 'भोलानाथ' हिंदी-उर्दू नाटक निर्माण करून त्यात नायकाची भूमिका करतांना (नोव्हेंबर १९६१)

# सहन करू नका. दुर्लक्ष करू नका.

## निरामय आरोग्य करा सुनिश्चित आणि तेही मोफत

डॉ. घोंगडेज् संजीवनी होमिओपॅथी, डाएट ॲण्ड योगा क्लिनिक आयोजित

# मोफत भव्य होमिओपॅथी शिबीर

रजिस्ट्रेशन अनिवार्य
फी रु. 199/- मात्र

**१ जून २०२२ ते ३१ जुलै २०२२ वेळः दररोज सकाळी १०.०० ते दु. ४.०० वाजेपर्यंत**

## डॉ. घोंगडेज् संजीवनी होमिओपॅथी, डाएट ॲण्ड योगा क्लिनिक



**नाशिक चॅप्टर**
**डॉ. योगेश घोंगडे**
एम.डी. (होमिओपॅथी),
गोल्ड मेडॅलिस्ट
डिप्लोमा इन योगा टिचर,फेलोशिप इन योगा थेरपी (एम.यु.एच.एस.)
तिबेटियन मार्केटसमोर, शरणपूर लिंक रोड, कॅनडा कॉर्नर, नाशिक -0२
9405465255
8275854255



**एक्स नाशिक 1**
**डॉ. चारूशिला घोंगडे**
डाएट ॲण्ड न्युट्रिशन काऊन्सिलर
बी.एच.एम.एस., बी.एस्सी. (फूड ॲण्ड न्युट्रिशन),
पी.जी.डी. पब्लिक हेल्थ न्युट्रिशन
तिबेटियन मार्केटसमोर, शरणपूर लिंक रोड, कॅनडा कॉर्नर, नाशिक -0२
9405465255
8275854255



**नाशिक - गोदावरी चॅप्टर**
**डॉ. सपना तांदळे (फड)**
बी.एच.एम.एस.
(होमिओपॅथी कन्सलटंट)
२, औदुंबर अपार्टमेंट, दत्तमंदिरशेजारी, नाशिकरोड-०१
8208281234
9422755544



**प्रपोज्ड नाशिक 1**
**डॉ. शीतल महाजन (पवार)**
बी.एच.एम.एस.
(होमिओपॅथी कन्सलटंट)
शॉप नं. ३, सूर्या बिल्डिंग, रासबिहारी इंटरनॅशनल स्कूललगत, बळी मंदिर, पंचवटी, नाशिक-०३
9421822255

## SATURDAY CLUB DOCTORS

**पुणे - कोरेगाव पार्क चॅप्टर**



**डॉ. ज्योत्स्ना सोनवणे**
बी.एच.एम.एस.
(होमिओपॅथी कन्सलटंट)
फ्लॅट नं.4, पहिला मजला, बँक ऑफ इंडिया शेजारी, पु.ना. गाडगीळ समोर, विमान नगर, पुणे-411014.
9405152255

**पुणे - हडपसर चॅप्टर**



**डॉ. जान्हवी पाटील**
बी.एच.एम.एस.
(होमिओपॅथी कन्सलटंट)
फ्लॅट नं.4, सर्वे नं. १५६, गंधर्व सेरेनिटी,विलू पूनावाला हॉस्पिटलसमोर, भोसले नगर, हडपसर, पुणे-411028.
9403159255

**पुणे - डेक्कन चॅप्टर**



**डॉ. स्नेहा कुंटे(काळे)**
बी.एच.एम.एस.
(होमिओपॅथी कन्सलटंट)
फ्लॅट नं.1, पहिला मजला, चैत्रबेन रेसिडेन्सी, क्रोमा शोरूम जवळ, १२७/२, सर्जा रोड, औंध, पुणे-412007.
9405022255

**एक्स डोंबिवली चॅप्टर**



**डॉ. प्रणिता वि. दोडे (पाटील)**
बी.एच.एम.एस.
(होमिओपॅथी कन्सलटंट)
१२, अंजली गणेश, शिवाजी गार्डनसमोर,फडके रोड, डोंबिवली (पूर्व), मुंबई-421201.
0251 2952929
9405422255

**धुळे - 2.0 भिडे चॅप्टर**



**डॉ. चारूशिला महाजन**
बी.एच.एम.एस.
(होमिओपॅथी कन्सलटंट)
1183, गल्ली क्र, 6, नगरपट्टी, सुभाष पुतळ्यासमोर, धुळे-424001.
02562 234255
9403377255

Gold Medalist Dr. Ghongde's Sanjivani®
HOMOEOPATHY DIET & YOGA CLINIC
इलाज सही... साइड इफेक्ट नही...
www.drghongdesanjivani.com

सल्ला व औषधे मोफत (फक्त ७ दिवसांसाठी) | महाराष्ट्रातील सर्वोत्तम होमिओपॅथी तज्ज्ञांकडून उपचार. शिबिरात किंवा फोन कॉलद्वारे नोंदणी करता येईल.

कळवण: डॉ. दत्तात्रय खोले - 9420764543 / 9405512255 | ठाणे (लवकरच सुरु होत आहे.): डॉ. निवेदिता - 9404242255

**ऑनलाइन कन्सल्टेशन सुविधा उपलब्ध. | औषधांची घरपोच सेवा उपलब्ध.**

लठ्ठपणा, वजन कमी असणे आणि इतर आजारांवर शास्त्रोक्त पद्धतीने आहार तज्ज्ञांकडून उपचार | रजिस्ट्रेशन फी रु. १९९/-. संपर्क: 0253-2954255

महाराष्ट्रातील संजीवनी होमिओपॅथी क्लिनिकच्या विविध शाखांसाठी बी.एच.एम.एस. डॉक्टर्स पाहिजेत.

GiriMedia.in

॥ श्री ॥

Reg. No. I-56118-A

# अष्टांग आयुर्वेद

## सुपर स्पेशालिटी हॉस्पीटल




**डॉ. प्रविण केंगे**

B.A.M.S., M.D. (A.M.)
P.G.C.C.H.

Ayurved Physician &
Panchakarma Cosultant

मो. 9422283817


**हॉस्पिटल :** दास मारूती मंदिराजवळ, दास मारूती चौक, चेतनानगर, राणेनगर, नाशिक. मो. 9270433863

**शाखा :** उदय नगर, लेन नं.२, सिंडिकेट बँकेसमोर, जेहान सर्कल, गंगापूर रोड, नाशिक

**शाखा :** पिंपळस (रामाचे), ता. निफाड, जि. नाशिक

## * खालील आजारांवर प्रभावी चिकित्सा उपलब्ध आहे *

### * आरोग्य विषयक तक्रारी *

* पचनासंबंधीच्या तक्रारी
* मुळव्याध
* आम्लपित्त - ॲसिडीटी
* निद्रानाश
* अंगावर पित्त उठणे
* जुनाट सर्दी खोकला
* संधिवात, आमवात
* काविळ
* पित्ताश्मरी
* मूतखडा
* हृदय व रक्त वाहिन्याचे आजार
* पाठीच्या मणक्याचे आजार
* वजन वाढविणे - कमी करणे
* किडनी/मूत्रासंबंधी आजार
* Deep Vein Thrombosis
* एड्स - कॅन्सर सल्ला
* सर्व त्वचा विकार / सोरायसिस
* उदर (पोटात पाणी वाढणे)
* दमा
* डायबेटिस
* रक्तदाब (B.P)
* Spondylities
* पक्षाघात
* मेंदूचे विकार
* मान्सविकार
* लैगिंक समस्या
* सर्व नेत्र आजार





### पाठीच्या मणक्याचे आजार

* पाठदुखी
* मानदुखी
* स्पाँडिलायटिस
* कंबरदुखी
* लंबॅगो
* सायटिका
* स्पाईन प्रॉब्लेम
* कार्ड कॉम्प्रेशन
* फ्रोझन शोल्डर
* स्लिपडिक्स
* हात पाय लुळा पडणे
* बधीर होणे/मुंग्या येणे

### सौंदर्य विषयक तक्रारी

* त्वचाविकार
* मुरुम / पुटकुळ्या
* पांढरे डाग/कोड
* चेहऱ्यावर वैवर्ण्य/व्यंग
* केस पांढरे होणे, गळणे
* केस दुभंगणे/चाई
* चामखिळ
* केसांमध्ये कोंडा होणे

### पुरुषांचे आजार

* पुरुषवंधत्व
* पौरुषग्रंथी वृध्दी
* Low Sperm Count
* Low Sperm Motality
* लैगिंक समस्या इत्यादी

### स्त्रियांचे आजार

* स्त्रीवंध्यत्व
* पाळीच्या तक्रारी
* कंबरदुखी
* स्तनाचे आजार
* P.C.O.D.
* Fallopian Tube Block
* Ovarian Cyst * Uterine Fibroid
* प्रसुतीपूर्व व पश्चात तपासणी
* नॉर्मल प्रसुतीसाठी पंचकर्म
* वजन कमी करणे.

### बालकांचे आजार

* वाढ न होणे
* बाल दमा
* जुनाट सर्दी खोकला
* फिट्स
* दात येतांना होणारा त्रास
* मतिमंद बालक
* बुध्दी स्मृती एकाग्रता वाढविणे
* उंची वाढविण्यासाठी उपचार *

**उपलब्ध सुविधा :** सुसज्ज आंतररुग्ण विभाग, शास्त्रशुध्द पंचकर्म विभाग, सुसज्ज औषधी विभाग
E.C.G, BLOOD SUGAR, NEBULISATION

## DOOR TO DOOR AMBULANCE SERVICE

(Pick N Drop Facility For Patients)





अत्यल्प दरात रूग्ण सेवा दारादारात...

## पंचकर्ममधील उपलब्ध सुविधा

वमन | बस्तिकर्म | स्वेदन | नस्यकर्म | रक्तमोक्षण | शिरोबस्ती | नेत्रतर्पण | पिंडस्वेदन | गर्भसंस्कार



हृदयबस्ती | मन्याबस्ती | कटीबस्ती | जानु बस्ती | शिरोधारा | स्नेहन(अभ्यंग/मसाज) | नाडी परिक्षण | कर्ण पुरण | जलौकावचारण


Yashoraj 9823013124

मराठी उद्योजकता दिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा



इंजि. माधवराव भिडे
संस्थापक - सॅटर्डे क्लब ग्लोबल ट्रस्ट

१२ जुलै
मराठी उद्योजकता दिवस
|| एकमेकां सहाय्य करु | अवघे होऊ श्रीमंत ||

Proud Member Of
**Saturday Club Global Trust**

PAP WRAP™
*Best For Waste*

**THE ONLINE RADDIWALA**

+918108101343 papwrap2022@gmail.com

# स्वर्गीय श्री माधवराव भिडे सर



12 जुलै 2022

## मराठी उद्योजकता दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

**Proud Member of Saturday Club Global Trust**

XMETRIC
Water Solutions Pvt. Ltd.

## We Provide Solutions for W ater Pollution

- Consitancy Services for ETP/ STP/WTP
- Turnkey Projects For -
  Effluent Treatment Plant,
  Sewage Treatment Plant
- Multi - Effect Evaporator Plant
- Water Treatment Plant (DM/RO)
- Water Recycle Plant (UF/RO)
- Membrane Bio Reactor
- Liasioning Services For MPCB
- Zero Liquid Discharge (ZLD) Concept

**For More Details** Call Us : **90 11 11 07 08**

# भिडे साहेबांनी रचलेली कविता

**बऱ्याच लोकांना बहुधा हे माहित नसावे कि भिडे साहेब हे एक उत्तम कवी हि होते त्यांनी अनेक कविता रचल्या होत्या.**
**कविता कशी स्फुरते हयावर भिडे साहेबांनी एक सुंदर कविता रचली होती ती इथे दिली आहे.**

## स्फूर्तीचा तो पेला

असाच येतो बनुनी अचानक स्फूर्तीचा तो पेला
असेच फुटिती पंख अचानक कधीही डोळयांना
असेच फुटिती कोंब कोवळे नाजूक हृदयाला
असेच येती तरंग कंपित फुलवित भाव कळया
असाच येता बहर मनाला प्राजक्ताच्या शुभ्र गोजिऱ्या
उजळ सकाळी निळया आभाळी लाल गुलमोहर शोभिती
हरीत तुलांच्या मखमालीवरी इवली रान फुले शोभिती
आणि तयावर गोंडस दिसते सान बालक खेळत
प्रसन्नतेचा वाऱ्यावर फडफडते मनाचे नौकाशेड
प्रवास करता गाडीमधूनी त्याच त्या जीवनाचा
घडिता कधी नवल परी ते सामोरी धुंद यौवनाचा
त्यास ही जाता क्षणांसारखा जातो तो निजस्ताला
डाळिंबीचे अम्बाडयातील फुलही घेत राहते मनाला तना
अंधारी चमके हिरकणी प्रेमाची त्यागाची
थरथरते ओलावते आणि साकळते आत कुठं आणि काही तरी
अशीच भरते कधी अचानक भयफल कोमल भावांची
असेच येते उफाळून संगीत, अशीच पखरण पुष्पांची
असेच दिसते नकळत घडते काय म्हणावे जादूला
असाच येतो भरुनी अचानक स्फूर्तीचा तो पेला

❖❖❖

SATURDAY CLUB GLOBAL TRUST
Regn. No. E-26480 (Mum)
www.scgt.org.in

# भिडे साहेबांप्रती काही निवडक भावना

सर कधी पाहिले नाही प्रत्यक्ष तुम्हाला
पण तुमची ऊर्जा जाणवली क्षणाक्षणाला

Saturday club global trust या बीजारोपणाला तुम्ही निमित्त झालात
आज त्याचाच मोठा वटवृक्ष झाला
विसरु कसे आम्ही तुम्हांला

एकमेंका साहय करु अवघे होऊ श्रीमंत
या शब्द मंत्राने दुमदुमले महाराष्ट्राचे आसमंत
आता करु सातसमुद्र पादाक्रांत

मराठी व्यावसायिकांची आपण बांधली एकजूट
अधिक कणखर होईल आता मराठी वज्रमूठ

अखंड लक्ष्मीपूजनाचे व्रत लाभले आम्हाला
अधिक जोमाने खेचू या जगन्नाथाच्या रथाला

आपल्या पश्चात दुगाडे सरांचे मार्गदर्शन लाभले आम्हाला
त्यांच्याच हस्ते वाहते हे काव्यसुमन आपल्या स्मृतीला

**Dr Mugdha Ogale (Utkarsh Homeopathy) - Malad 2.0**

❖❖❖

## आठवण - भिडे सर - थॅक्यू

भिडे सर आणि माझी पहिली भेट म्हणजे २०१६ चा नाशिक येथे पार पडलेला उद्योग कुंभ. मी गेस्ट म्हणून या इव्हेंटला उपस्थित होते मुलुंड चॅप्टरच्या रुपाली ठाकूर यांच्यासोबत. काय कमालीचे तेज त्यांच्या चेहऱ्यावर, काय ती एनर्जी, काय ते जबरदस्त पॅशन आणि प्रत्येकाशी बोलतांना त्यांच्या उच्चारांमध्ये, त्यांच्या बोलीमध्ये असलेला तो आपलेपणा. खऱ्या अर्थाने लीडिंग बाय एक्झाम्पल - पॅशन इन द हॉर्ट अँड फायर इन द बेली.
उद्योग कुंभ ला भिडे सरांचे भाषण पार पडले आणि मी आणि रुपाली ठाकूर आम्ही दोघी त्यांना भेटायला गेलो. त्यांच्या अवतीभवती असलेल्या उद्योजकांच्या गराडयात आम्ही एका बाजूला उभ्या राहून वाट पाहत होतो की, आम्हांला सरांना भेटण्याची संधी कधी मिळेल. संधी मिळताच आम्ही सरांना भेटलो, त्यांना आमचे व्हिजिटिंग कार्ड दिले आणि तेवढया वेळेत सुध्दा सरांनी आमच्या बिजनेस विषयी चौकशी केली. क्रीडा, शैक्षणिक, कलाक्षेत्रात भारतात आणि भारताबाहेर मुलांना व पालकांना आम्ही करत असलेल्या मार्गदर्शनाबद्दल त्यांना खूप अप्रूप वाटले. ''तुमचा व्यवसाय खूप वेगळा आहे, खूप प्रगती करा असेच काम करत राहा, खूप छान काम करत आहात तुम्ही'', हे भिडे सरांचे शब्द आणि त्यांनी पाठीवर दिलेली कौतुकाची थाप हि आमचा उत्साह व्दिगुणित करुन गेली.
त्यानंतर पुढे १७ ऑगस्ट २०१७ ला भिडे सरांच्या ऑफिसमधल्या वन टू वन मध्ये सुध्दा त्यांनी आम्हाला त्यांचे साडेतीन तास दिले आणि मोलाचे मार्गदर्शन केले. सरांबरोबरची ही मीटिंग माझ्यासाठी बोरीवली चॅप्टरचे सदस्यत्व घेण्यासाठी एक इन्स्पिरेशन ठरली.

आपल्या सॅटर्डे क्लब ग्लोबल ट्रस्टच्या विविध मीटिंगमध्ये, इव्हेंटमध्ये अनेक वेळा सरांना ऐकण्याची, भेटण्याची संधी मिळाली. पण उद्योगकुंभ मधले त्यांचे प्रोत्साहन पर शब्द आणि पाठीवरची थाप अजूनही ताजी आहे आणि सतत आम्हाला आमच्या कामाविषयी ऊर्जा देत राहते.
**अशा या गुरुवर्यांना आमचा मानाचा मुजरा.**

**वैशाली भिडे बर्वे (डायरेक्टर)**
मॅक्सज्ञान ऍडव्हायझरी प्रायव्हेट लिमिटेड
९८२०३८२११७

❖❖❖

**कोकणात उद्योजक चळवळीचं बीज रुजविणारे माधवराव भिडे**

भिडे साहेबांच्या पत्रव्यवहाराला ''कशाला स्वतःचा वेळ फुकट घालवताय ?'' असं एकमेव उत्तर जिथून आलं. त्या रत्नागिरीत सॅटर्डे क्लबची सुरुवात भिडे साहेबांच्या देहवासनाच्या दुसऱ्या दिवशी झाली. जणू काही त्यांच्या स्मृती जतन करण्यासाठी रत्नागिरीसारख्या उद्योजकीय पार्श्वभूमी नसलेल्या भागात, उद्योजक चळवळीचं बीज अंकुरित झालं.
हजारो उद्योजकांच्या नियतीला बदलून टाकणारा झंझावात माधवराव भिडे सरांच्या विचारात आहे !
''आलं मोठं मुंबयकर, शिकवणारं'' हा attitude असणाऱ्या कोकणात, अथक प्रयत्नानंतर का होईना, पण सॅटर्डे क्लब रुजला, हे रत्नागिरीतल्या उद्योजकांचं भाग्य म्हणावं लागेल. सुटाबुटात येणं, ३ स्टार, ५ स्टार हॉटेलमध्ये बसणं, उद्योगाची, श्रीमंतीची चर्चा करणं हे पचायला जड, पण हया द्रष्ट्या विचारवंताने, हया गोष्टींचे महत्त्व बऱ्याच वर्षांपूर्वी जाणलं आणि सामान्य उद्योजकाच्या आयुष्यात रुजवण्याचा प्रयत्न केला.
SCGT क्लबचं ध्येयधोरण, ऑर्गनाझेशनल Structure (संरचना), मीटिंग घेण्याची पध्दत, कुलदेवतेचं स्मरण, प्रतिज्ञा, ब्रीदवाक्य हे सारं काही Positive Affirmation (सकारात्मक विचार) पेरुन जाणीवपूर्वक मनाशी मशागत करण्यासाठी योजलं आहे, हे सूक्ष्मपणे निरीक्षण केलं तर जाणवतं.
उद्योगशील व्हा,श्रीमंत व्हा, लीडर व्हा, हे आदरणीय भिडे साहेबांनी नुसतं सांगितलं नाही, तर ते कसं आचरणात आणावं, याची कार्यशाळा जणू SCGT च्या स्वरुपात त्यांनी उभी केली.
SCGT हे एक कधीही न संपणारं, अक्षयपात्र आहे. कोणी प्रेरणा घ्यावी, कोणी Reference घ्यावे, कोणी आधार घ्यावा, कोणी नव्या कल्पना घ्याव्यात. प्रत्येक उद्योजकांसाठी इथे काही ना काही आहे.

**प्रतीक कळंबटे - सेक्रेटरी, रत्नागिरी चॅप्टर**

❖❖❖

